

# भोजन प्रार्थना

महाराष्ट्रात भोजन सुरू करण्या अगोदर ‘ वदनी कवळ घेता ’ ही प्रार्थना म्हणण्याची प्रथा खूप जुनी आहे. त्याला अध्यात्माची जोडही आहे. संस्कृतमध्येही असे अनेक श्लोक व प्रार्थना आहेत. प्रस्तुत भोजन मन्त्र हा त्याच पठडीतील आहे.

हा भोजन मन्त्र कृष्ण यजुर्वेदाच्या तैतरीय शाखेशी संबंधित प्रमुख श्रौतसूत्र, बौधायन श्रौत सूत्रातील १८व्या प्रश्नात अठरावा आहे. हा मंत्र अन्नाचे सर्वोच्च महत्त्व आणि त्यातून मिळणारे आध्यात्मिक आणि भौतिक फायदे दर्शवितो. धान्य, भात आणि आमीक्ष (दुग्धजन्य उत्पादने- दही,तूप,चीज इ.) येथे पोषण आणि समृद्धीचे प्रतीक आहेत. या मन्त्रामध्ये अन्नाप्रती कृतज्ञतेची भावना आणि त्याचे महत्त्व व्यक्त करण्यात आले आहे. अन्न हे केवळ शारीरिक पोषणाचे साधन नाही, तर आध्यात्मिक आणि भौतिक विकासाचे माध्यम देखील आहे.

ॐ यन्तु नदयो वर्षन्तु पर्जन्याः सुपिप्पला ओषधयो भवन्तु ।
अन्नवताम् ओदनवताम् आमिक्षवताम् एषां राजा भूयासम् ॥
ओदनमुत् ब्रुवते परमेष्ठी वा एषः यदोदनः ।
परमामेवैनं श्रियं गमयति ॥

मराठी- नद्या वाहोत. भरपूर पाऊस पडो. झाडांना भरपूर फळे येवोत (औषधी) वनस्पती फळोत, फुलोत. अन्नधान्य, तांदूळ आणि दुग्धजन्य पदार्थ इत्यादी उत्पादन करणाऱ्या लोकांचा मी प्रमुख व्हावे. हा भात म्हणतो, ‘परमेष्ठी (सर्वोच्च) सुद्धा तोच आहे ज्याच्याकडे हा भात (धान्य) आहे.’ हा भात (धान्य) खरे तर त्याला श्रेष्ठ ऐश्वर्यापर्यंत घेऊन जातो.

टीप- काही अभ्यासकांनी ‘ ताटात शिजवलेले अन्न हे देवाने दिलेली एक देणगी आहे ज्याचे सेवन केल्याने समृद्धी आणि कल्याण उच्च पातळीवर जाईल ’ असा अर्थ घेतलेला दिसतो.

********************

धनंजय बोरकर (९८३३०७७०९१)